MHLC280001872024

निशाणी ओ—३

दाखल दिनांक : १९/१०/२०२४
नोंदणी दिनांक : १९/१०/२०२४
निकाल दिनांक : ०७/०३/२०२६
कालावधी : ०१ वर्ष ०४ म. १९ दि.

**कामगार न्यायालय, बुलढाणा.**
**(श्री.शार्दुल श.जहागिरदार, नियंत्रक अधिकारी तथा न्यायाधीश)**

**अर्ज (उपदान) क्रं. ७३/२०२४**

**भास्कर शंकर वाघ,**
**मयत चालक तर्फे वारस पत्नी :**
पुष्पा भास्कर वाघ,
वय ६५ वर्षे, व्यवसाय—काही नाही,
रा. वडशिंगी, ता. जळगाव जामोद,
जि. बुलडाणा. .. **अर्जदार**

**—विरुध्द—**

**विभाग नियंत्रक,**
महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ,
विभागिय कार्यालय, मलकापुर रोड,
बुलडाणा, ता. जि. बुलडाणा. .. **प्रतिवादी**

**दावा :—** **अर्ज (उपदान कायदा अंतर्गत) उर्वरित उपदान रक्कम रुपये १७,१८५/— मिळणेकरीता.**

**विधिज्ञ :—** श्री. जी. आर. गावंडे, अर्जदाराकरीता.
श्री. एस. एस. सासनकर, प्रतिवादींकरीता.

## निकालपत्र

(पारीत दिनांक ०७/०३/२०२६)

**१)** प्रस्तुतचा उपदानाचा अर्ज अर्जदार मयत भास्कर शंकर वाघ हयांचेतर्फे पुष्पा भास्कर वाघ हयांनी दाखल केला असून असे प्रतिपादन केले आहे कि, या प्रकरणातील प्रतिवादी म्हणजे विभाग नियंत्रक महाराष्ट्र परिवहन महामंडळ, बुलढाणा यांच्याकडे त्यांचे मयत पती दि. ४/५/१९७९ रोजी चालक म्हणुन रोजंदारी तत्वावर रुजु झाले आणि आजारपणामुळे दि. ४/५/१९९६ रोजी स्वेच्छानिवृत्ती घेतली. त्यानंतर दि. १३/०६/२००१ रोजी त्यांचा मृत्यु झाला. अर्जदारांच्या मयत पतीने प्रतिवादींकडे एकुण १७ वर्षे ०१ महिने व ०२ दिवस पर्यंत सलगपणे सेवा केली आहे. परंतु त्यांना केवळ ०८ वर्षाची उपदानाची रक्कम प्रतिवादींकडुन देण्यात आली.

**२)** अर्जदार पुढे असे म्हणतात की, त्यांच्या मयत पतीच्या स्वेच्छानिवृत्तीच्या काळात त्यांचे मुळ वेतन रू. ३८१९/— आणि महागाई भत्ता रू. १९०९.५०/— एवढे लावुन प्रतिवादींकडुन ०८ वर्षांची उपदान रक्कम १५,२७६/— रु. एवढी दिली. वास्तविक पाहता अर्जदाराच्या मयत पतीने प्रतिवादी महामंडळाकडे १७ वर्षे सेवा केली असल्यामुळे त्यास नियमानुसार ३२,४६१/— इतके उपदान अदा करणे आवश्यक होते, परंतु १५,२७६/— इतकीच रक्कम प्रतिवादींनी अदा केली व रक्कम रु. १७,१८५/— कमी अदा केली.

**३)** अर्जदार पुढे असे म्हणतात की, अर्जदाराचे पती हे आजारपणामुळे वारले व त्यांनी तत्पुर्वी स्वेच्छानिवृत्ती घेतली होती. घरची परिस्थिती दयनिय असल्याने त्यांनी प्रतिवादींकडे त्यांच्या देय रकमेची

मागणी केली होती व जी रक्कम प्रतिवादींनी दिली ती त्यांनी स्वीकारली. त्यानंतर मिळालेल्या पैशांचा हिशोब केल्यावर तसेच आवश्यक ती कागदपत्रे मागणी करुनही प्रतिवादींनी दिली नाही. प्रतिवादींना उपदानाकरीता फॉर्म—आय हा सुध्दा देण्यात आला परंतु, त्याचा काहीही उपयोग झाला नाही आणि त्यामुळेच प्रतिवादींना असे निर्देशीत करण्यात यावे की, त्यांनी अर्जदारांना रू. १७,१८५/— आणि त्यावर १२ टक्के व्याज प्रदान करावे आणि अर्जदारांचा हा अर्ज मंजूर करण्यात यावा अशी प्रार्थना करतात.

**४)** प्रतिवादींनी आपली लेखी कैफियत नि. क्रं. सी—२ खाली दाखल केलेली असून, असे कथन केले आहे की, या प्रकरणात अर्जदारांनी उपदान रकमेची जी मागणी केली आहे, ती खोटी असून हा अर्ज पुर्णपणे फेटाळण्यास पात्र ठरतो. प्रतिवादी पुढे असे म्हणतात की, अर्जदारांचे मयत पती यांनी १९९६ मध्ये स्वेच्छानिवृत्ती घेतली आणि हे प्रकरण जवळजवळ ३० वर्षांनी दाखल केले आहे. अर्जदाराच्या मयती पतीला नियमानुसार हिशोब करुन संपुर्ण उपदान रक्कम देण्यात आली आहे, त्यामुळे आता प्रतिवादी कोणतीही रक्कम देण्यास जबाबदार ठरत नाहीत.

**५)** प्रतिवादी पुढे असे म्हणतात की, ज्यावेळी अर्जदारांचे मयत पतीला उपदानाची रक्कम देण्यात आली, त्यावेळेला प्रस्तुतची रक्कम ही कमी आहे याबाबत कुठलीही लेखी अथवा तोंडी हरकत अर्जदाराचे मयत पतीनी घेतली नाही आणि देण्यात आलेली उपदानाची रक्कम बरोबर आहे, याची माहिती अर्जदाराचे पतीला असल्यामुळे त्याबाबत त्यांनी तक्रार केली नाही आणि त्यामुळे हा अर्ज चुकीचा ठरतो आणि

प्रतपालनीय नाही. प्रतिवादी पुढे असे म्हणतात की, अर्जदारांचे पतीला उपदान रक्कम देतांना ती कशाप्रकारे आणि किती वर्षाची काढली याची संपुर्ण माहिती देण्यात आली होती आणि यावर त्यांनी कोणतीही हरकत घेतली नव्हती. त्यामुळेच आता हरकत घेवून त्यांना हा अर्ज दाखल करण्याचा कायदेशीर अधिकार नसल्यामुळे प्रस्तुतचा अर्ज पुर्णपणे फेटाळण्यास पात्र ठरतो.

**६)** प्रस्तूत प्रकरणात निशाणी क्रं.ओ—२ वर खालील मूद्दे निश्चीत करण्यात आलेले आहेत, त्यावर माझे निष्कर्ष खालील कारणांसाठी म्हणून देत आहे —

| **अ. क्र.** | **मुद्दा** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १) | अर्जदार हे सिध्द करतात का, कि त्यांचा प्रस्तुतचा उपदानाचा अर्ज कायदेशिर दृष्टया योग्य आहे का ? | नकारार्थी. |
| २) | अर्जदार हे सिध्द करतात का, कि त्यांनी मागितलेल्या दादसाठी ते पात्र आहेत ? | नकारार्थी. |
| ३) | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>मुद्दा क्रं. १ व २ करीता</u>** :—

**७)** मुद्दा क्रं. १ व २ चे अवलोकन करतांना हे स्पष्ट होते कि, अर्जदारांनी उर्वरित उपदानाची रक्कम रुपये १७,१८५/— आणि त्यावर १२ टक्के व्याज मिळण्याकरिता म्हणून हा अर्ज दाखल केलेला आहे, त्यावर प्रतिवादी हयांचे कथन आणि तोंडी युक्तीवाद असा आहे कि,

मुळातच हा अर्ज अर्जदारांनी जवळपास ३० वर्षाच्या विलंबानंतर दाखल केलेला आहे. त्यामुळे त्यात कोणतेही तथ्य नाही तसेच मयत भास्कर वाघ यास उपदानाची सर्व रक्कम देण्यात आलेली असल्यामुळे आता कोणतीही रक्कम प्रतिवादी देण्यास बांधील ठरत नाहीत.

८) अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज उपदानाची उर्वरित रक्कम मिळण्याकरीता म्हणून प्रतिवादींविरूध्द दाखल केलेला आहे आणि या प्रकरणात अर्जदाराचे मयत पती आणि प्रतिवादी यांच्यामध्ये कामगार—मालक या नात्यावरून कोणताही संघर्ष नाही, उलटपक्षी प्रतिवादींना हे मान्य आहे की, अर्जदाराचे मयत पतीनी त्यांच्याकडे चालक म्हणून सेवा बजावलेली आहे. अर्जदारांचे कथन असे आहे की, प्रतिवादींकडे चालक म्हणून जवळपास १७ वर्षे एवढी सेवा बजावलेली असल्यामुळे अर्जदार संपुर्ण उपदानाची रक्कम मिळण्यास पात्र ठरतात, परंतु प्रत्यक्षात वेतनाची रक्कम रू. १७,१८५/— ही दिलेलीच नाही, तर प्रतिवादींचे त्यावर कथन असे आहे की, मुळातच ही मागणीच ३० वर्षाच्या विलंबानंतर करण्यात आलेली असल्यामुळे कायदेशीरदृष्टया हा अर्जच चुकीचा ठरतो. त्यामुळे या प्रकरणात दाखल केलेल्या पुराव्याचा स्वतंत्रपणे परामर्श घेणे आवश्यक ठरते.

<u>अर्जदारांचा पुरावा</u>

**१) निशाणी क्रं.यु—७ खाली प्रतिवादींकडून मिळालेले पत्र.**

**२) निशाणी क्रं.यु—८ खाली उपदान मागणीबाबत गैरअर्जदार यांना दिलेला अर्ज.**

**३) निशाणी क्रं.यु—९ खाली दोषारोप पत्राची प्रत व जळगाव न्यायालयाचा आदेश.**

**४) निशाणी क्रं.यु–१० माहिती अधिकाराबाबतचे दिलेले पत्र व सोबतचे दस्त.**

**<u>प्रतिवादींचा पुरावा :</u>**

**१) नि.सी–५ खाली मयत भास्कर वाघ यांचा कामावर हजर वर्षाचा तक्ता**

**९)** मुळातच, प्रस्तुतचे प्रकरण हे अर्जदारांनी दाखल केलेले असल्यामुळे कायदेशिरदृष्टया योग्य कसे आहे आणि मागितलेली दाद मिळणेकरीता अर्जदार पात्र आहेत हे सिध्द करण्याची जबाबदारी सुध्दा अर्जदारांचीच ठरते. प्रस्तुतचे प्रकरण अर्जदारांनी जवळपास ३० वर्षाच्या विलंबाने दाखल केलेले आहे ही बाब अभिलेखावर दाखल असलेल्या सर्व कागदपत्रांचे अवलोकन केल्यानंतर स्पष्ट होते. जरी उपदान प्रदान कायदयाखाली विलंब लागु होत नसला तरी ३० वर्षे प्रकरण दाखल करण्यास झालेला विलंब याबदद्ल कोणतेही तार्कीक स्पष्टीकरण अर्जदारांकडुन होत नाही.

**१०)** अर्जदारांनी आपल्या अर्जातुन आणि शपथपत्रातुन त्यांच्या ३० वर्षाच्या विलंबाच्या अनुषंगाने कोणतेही भाष्य केलेले नाही, जे की त्यांनी मागितलेल्या दाद करीता ते पात्र आहेत हे सिध्द करण्याकरीता आवश्यक ठरते. मुळातच अर्जदारांनी त्यांच्या मयत पतीस त्यांनी केलेल्या मागणी नुसार उपदान अनुज्ञेय कसे होते त्याचा कोणताही हिशोब अभिलेखावर दाखलच केलेला नाही. त्याच प्रमाणे अर्जदारांनी त्यांच्या तर्फे साक्ष देणेकरीता त्यांच्या मुलास प्रकाश भास्कर वाघ याला अधिकार पत्र दिल्यानंतर आणि त्याअनुषंगाने नि. यु–६ खाली दाखल केलेल्या

शपथपत्रावर प्रतिवादींनी जेव्हा उलटतपासणी घेतलेली आहे त्यामध्ये त्याने पुढीलप्रमाणे मान्यता दिली आहे :

**माझे वडील १९९६ मध्ये सेवानिवृत्त झाले आणि प्रस्तुतचे प्रकरण हे सन २०२४ मध्ये म्हणजेच जवळपास २८ वर्षाच्या विलंबाने दाखल करण्यात आले. मला विलंबाबाबत कोणतेही कारण सांगता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्यांचे वेतन ३८१९/— रु. एवढे होते या कथनाच्या अनुषंगाने अभिलेखावर मी कोणतेही कागदपत्रे दाखल केलेली नाहीत. माहितीच्या अधिकारात मी प्रतिवादींकडे उपदान रक्कम देण्यात यावी म्हणुन अर्ज केला होता परंतु त्याची प्रत अभिलेखावर दाखल केली नाही.**

**११)** त्यामुळे हे स्पष्ट होते की, प्रतिवादींच्या या युक्तीवादामध्ये पुर्णपणे तथ्य आहे की, मुळातच हा अर्जच ३० वर्षाच्या विलंबानंतर दाखल केलेला आहे, ज्याचे कोणतेही समर्थन अर्जदारांकडुन होत नाही. तसेच उपदानसंदर्भात देखील कोणताही ठोस पुरावा अभिलेखावर दाखलच करण्यात आलेला नाही. अर्जदारांनी नि. यु—२ खाली जे कागदपत्रे दाखल केलेली आहेत त्यांचे अवलोकन केल्यानंतर हे स्पष्ट होते की, अर्जदारांनी जी मागणी केलेली आहे ती योग्य व कायदेशीर आहे हे सिध्द करण्यात अर्जदारांना पुर्णपणे अपयश आलेले आहे, ज्यामुळे मुद्दा क्रं. १ व २ नकारार्थी ठरत असून खालील आदेशान्वये प्रस्तुतचा अर्ज निकाली काढण्यात येत आहे :—

## आदेश

(१) अर्ज नामंजुर करण्यात येत आहे.

(२) सर्व पक्षांनी आप—आपला खर्च सोसावा.

(३) प्रकरणाची नस्ती बंद करण्यात येत आहे.

SHARDUL SHASHIKANT JAHAGIRDAR

Digitally signed by SHARDUL SHASHIKANT JAHAGIRDAR
Date: 2026.03.09 11:44:53 +0530

**दिनांक :— ०७/०३/२०२६** **(शार्दुल श. जहागिरदार)**

**न्यायाधीश,**

**ठिकाण :— बुलढाणा.** **कामगार न्यायालय, बुलढाणा.**

युक्तीवाद ऐकल्याचा दिनांक :— ०७/०३/२०२६
श्रुतलेखन दिल्याचा दिनांक :— ०७/०३/२०२६
टंकलिखीत केल्याचा दिनांक :— ०७/०३/२०२६
निकालपत्र तपासणी आणि स्वाक्षरी दि. :— ०७/०३/२०२६